# सूचना

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (एल.) क्र.११३७/२०१८ सह जनहित याचिका क्र. ७२/२०१८ (जनहित याचिका क्र.४६/२०१८ – औरंगाबाद खंडपीठ) मध्ये दि.०३/०५/२०१८, रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील, विविध जिल्हा न्यायालयात लघुलेखक (निम्नश्रेणी), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/ हमाल यांची रिक्त पदे भरण्याकरिताची मध्यवर्ती ऑनलाईन सेवाप्रवेश प्रक्रिया (सेंट्रल ऑन-लाईन रिक्रुटमेंट प्रोसेस) ही पुढे सुरु करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सदर आदेशाची प्रत मा. उच्च न्यायालयाच्या https://bhc.gov.in/bhcrecruitment या वेबसाईटवर माहितीकरिता उपलब्ध आहे.

वर नमुद आदेशास अनुसरुन, इच्छुक उमेदवारांना ऑन-लाईन अर्ज करण्याकरीता संबंधीत वेबसाईट दि.०८/०५/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता सुरु करण्यात येईल व ती दि. १२/०५/२०१८ रोजी सायंकाळी ५.३० वाजता निष्क्रीय करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या उमेदवारांनी वर नमुद याचिकेत दि. ०६/०४/२०१८ रोजी पारित स्थगनादेशापुर्वी प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केले असतील त्यांनी प्रस्तुत भरती प्रक्रियेत पुनःश्च अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

ज्या उमेदवारांची छायाचित्रे/सही फाईल्स यापुर्वी अपलोड झाल्या नाहीत त्यांना त्यांच्या लॉग-ईन वर सदर छायाचित्र/सही फाईल्स अपलोड करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या वर नमूद आदेशास अनुसरुन दिव्यांग व्यक्ती (differently abled persons) या वर्गाखाली उमेदवारांनी दाखल केलेले अर्ज पुढील आदेशापावेतो प्रलंबित ठेवण्यात येतील.

Tavade 4/5/18

दिनांक : ०४ मे, २०१८

(सुरेंद्र पी. तावडे)
प्रबंधक (निरीक्षणे-१)